**शिक्षण हक्क अधिनियमानुसार दुर्बल व वंचित घटकाकरिता २५ टक्के ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया प्रभावीपणे राबविणे बाबत सुधारित कार्यपध्दती.**

# महाराष्ट्र शासन
## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
### शासन निर्णय क्रमांक:आरटीई-२०१७/प्र.क्र.३१५ /एस.डी-१

मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १७ मे, २०१८

<u>संदर्भ:-</u>

१) केंद्र शासनाची अधिसूचना दिनांक २७/८/२००९
२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, अधिसूचना क्रमांक पीआरई २०१०/प्र.क्र. २१२(बी)/पीई-१, दिनांक ११/१०/२०११
३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, अधिसूचना क्रमांक पीआरई २०१२/प्र.क्र. ११२/पीई-१, दिनांक १५/०३/२०१३
४) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, अधिसूचना क्रमांक पीआरई २०१४/प्र.क्र.४५/पीई-१, दिनांक १५/०५/२०१४.
५) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक : आरटीई-२०१७/प्र.क्र.३१५/एस.डी-१, दिनांक १६ जानेवारी, २०१८

<u>प्रस्तावना:-</u>

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ राज्यामध्ये दिनांक १ एप्रिल, २०१० पासून अंमलात आला आहे. सदर अधिनियमांतर्गत शासन अधिसूचना दिनांक ११ ऑक्टोबर, २०११ अन्वये तयार केलेले नियम लागू करण्यात आलेले आहेत. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ ची राज्यात प्रभावी अंमलबजावणी होण्याकरिता वेळोवेळी शासन निर्णय व अधिसूचना निर्गमित करण्यात आलेले आहेत.

२. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १२ (१) (सी) नुसार दुर्बल व वंचित घटकातील बालकांना खाजगी विना अनुदानित, खाजगी कायम विना अनुदानित व स्वयं अर्थसहाय्यित शाळांमध्ये (विना अनुदानित अल्पसंख्यांक शाळा, मदरसा, वेदिक पाठशाळा आणि धार्मिक शिक्षण देत असलेल्या शाळा वगळून) किमान २५ टक्के प्रवेश राखीव ठेवण्याची तरतूद आहे. तसेच अशा प्रवेशित बालकांच्या प्राथमिक शिक्षणाच्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्याची तरतूद आहे. दिनांक १५ मार्च, २०१३ च्या शासन अधिसूचनेन्वये २५ टक्के प्रवेशाबद्दलचे नियम व याबाबतची कार्यपध्दती विहित केलेली असून दिनांक १५ मे, २०१४ च्या अधिसूचनेन्वये ऑनलाईन प्रवेश पध्दतीने करावयाची कार्यपध्दती विहित केलेली आहे. उपरोक्त अधिसूचनेच्या

अनुषंगाने शासन निर्णय दि.१६ जानेवारी, २०१८ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ याकरिता २५ टक्के जागांवर Online प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. सन २०१८-१९ करिता आरटीई अंतर्गत २५ टक्के अंतर्गत १,२६,११७ इतक्या जागा उपलब्ध आहेत. याकरिता जवळजवळ १,८८,०००० इतके ऑनलाईन अर्ज प्राप्त असून, ४९,३१८ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष शाळेत प्रवेश घेतला आहे. सदर प्रवेश प्रक्रियेची प्रथम फेरी पूर्ण झाली असून, काही ठिकाणी दुसऱ्या/तिसऱ्या फेरीची प्रवेश प्रक्रिया सुरु आहे.

३. जनहित याचिका क्र.१०२/२०१६ श्री.राजेश्वर गणेश पांचाळ विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर प्रकरणी मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ मुंबई यांचे दि.२४/०४/२०१८ रोजीचे निर्णय विचारात घेऊन शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील यापुढील २५ टक्के प्रवेश प्रक्रिया सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. याबाबतचा शासन निर्णय खालीलप्रमाणे आहे.

**<u>शासन निर्णयः-</u>**

जनहित याचिका क्र.१०२/२०१६ श्री.राजेश्वर गणेश पांचाळ विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर मध्ये मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ मुंबई यांनी दि.२४/०४/२०१८ रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

"The State would implement the provisions of Section 2(d) of the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 in letter and spirit even during the pendency of such amendment. Public Interest Litigation stands disposed of accordingly."

२. मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ, मुंबई यांनी दिलेल्या उक्त निर्णयानुषंगाने **"वंचित गटामध्ये"** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व दिव्यांग बालकांव्यतिरिक्त वि.जा.(अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग (OBC) व विशेष मागास प्रवर्ग (SBC) यांचा समावेश करण्यात यावा. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्र.१४७/२०१४, नाझ फाऊंडेशन (इंडिया) ट्रस्ट विरुध्द केंद्र शासन व इतर प्रकरणी दि.०५/०५/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाचे अनुषंगाने एच.आय.व्ही.बाधित/एच.आय.व्ही. प्रभावित बालकांचाही समावेश करावा.

३. **<u>"दुर्बल गटामध्ये"</u>** ज्या बालकांच्या पालकांचे/ज्या बालकांचे पालन पोषण करणाऱ्या व्यक्तीचे उत्पन्न रुपये १ लाखाच्या आत आहे अशा बालकांचा समावेश करावा.

४. उपरोक्त प्रमाणे सुधारित झालेल्या **"वंचित गट" व "दुर्बल गटाच्या"** व्याख्येबाबत प्रचार व प्रसिध्दी द्यावी. तसेच आतापर्यंत वाटप झालेल्या प्रवेशाच्या जागा सोडून इतर रिक्त जागांसाठी वरील सुधारित व्याख्येप्रमाणे अर्ज मागविण्यात यावेत. याकरिता एन.आय.सी., पुणे यांनी आवश्यक ते बदल ऑनलाईन प्रणालीमध्ये तात्काळ करावेत.

५. मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ मुंबई यांनी उपरोक्तप्रमाणे दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी होण्याकरिता सदर प्रवेश प्रक्रिया ७ कार्यालयीन कामकाजाचे दिवसाकरीता थांबवावी व या कालावधीत वरील सुधारित व्याख्येप्रमाणे नवीन अर्ज मागविण्यात यावेत.

६. सदर योजनेचा लाभ जास्तीत जास्त बालकांना होण्याकरिता सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी त्यांच्या अधिकार क्षेत्रात प्रचार व प्रसिध्दी करावी.

७. यापूर्वी ज्या बालकांना/पालकांना सदर योजनेचा फॉर्म भरता आलेला नाही, त्यांनाही सदर ऑनलाईन प्रणालीमध्ये फॉर्म भरता येईल.

८. मा.न्यायालयाचे निर्णयानुसार "वंचित गटामध्ये" वि.जा.(अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग (OBC), विशेष मागास प्रवर्ग (SBC) तसेच एच.आय.व्ही.बाधित/एच.आय.व्ही.प्रभावित या गटातील बालकांचा नव्याने समावेश झाला असल्याने सदर बालकांच्या पाल्यांना उत्पन्नाच्या दाखल्याची आवश्यकता असणार नाही. तथापि, जात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. एच.आय.व्ही.बाधित / एच.आय.व्ही. प्रभावित बालकांसाठी जिल्हा शल्य चिकित्सक किंवा समकक्ष अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

९. सन २०१८-१९ मध्ये प्रवेश घेताना पालकांचे सन २०१६-१७ अथवा सन २०१७-१८ या वर्षातील उत्पन्नाचा दाखला प्रवेशाकरिता ग्राहय समजण्यात यावा.

१०. सन २०१८-१९ च्या ऑनलाईन प्रवेशाकरिता इतर बाबी शासन निर्णय दि.१६/०१/२०१८ प्रमाणे लागू राहतील.

११. वरीलप्रमाणे प्रचार/प्रसिध्दी देवून सन २०१८-१९ ची यापुढील प्रवेश प्रक्रिया पार पाडावी.

१२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५१७१५५१२७७९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Santosh Umeshrao Gaikwad

Digitally signed by Santosh Umeshrao Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1d60828c41033ab1da6d64ef17879745d578b334c05c1e8151ef933f134060bc, serialNumber=bc8833f9e213a7e4dfb9d2b071c9202ea52a04054e53b0c1bbf9e50c90a2cf5c, cn=Santosh Umeshrao Gaikwad
Date: 2018.05.17 15:52:09 +05'30'

**(संतोष गायकवाड)**
**अवर सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपालांचे सचिव,राजभवन,मुंबई
२) मा.अध्यक्ष, विधानसभा, विधानभवन,मुंबई यांचे खाजगी सचिव
३) मा.सभापती, विधानपरिषद, विधानभवन,मुंबई यांचे खाजगी सचिव
४) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे अपर मुख्य सचिव
५) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद,विधानभवन,मुंबई यांचे खाजगी सचिव
६) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
७) सर्व मा. विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य, विधानभवन,मुंबई

८) मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य,मुंबई
९) मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग
१०) मा.आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
११) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा, सर्व
१३) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे १.
१४) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे १.
१५) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
१६) संचालक, अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१७) संचालक, बालभारती,महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.
१८) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे
१९) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
२०) विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ सर्व
२१) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व
२२) एन.आय.सी., पुणे
२३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/निरंतर शिक्षण)/प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपालिका/कटक मंडळे सर्व
२४) गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, सर्व
२५) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई (सर्व कार्यासने)
२६) निवडनस्ती (कार्यासन- एसडी-१)